ePaper

| वर्ष - 8 | अंक -113 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 31 ऑक्टोंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# पिंपरी-चिंचवडमध्ये महाविकास आघाडीत बंडखोरीचे फटाके!

## आतील पानांत

- मुंबई इंडियन्सचं आधीचं ठरलंय?
- चेन्नई खेळाडूंना रिटेन करणार?
- महिलांना लाचार बनवताय
- कॅनडातील हिंसेमागे अमित शाह

## वेस्ट टू एनर्जी 'रोल मॉडेल' प्रकल्प

# मोशीकरांची अशी संपली! 'नरक यातना'



### मोशीकर म्हणतात... महेशदादामुळे परिसराचे नंदनवन झाले..!




**। पिंपरी । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी**

**आधुनिक युगाशी स्पर्धेच्या काळात शहरांचे वाढते नागरीकरण आणि पर्यावरण असमतोल हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिंपरी-चिंचवड शहराची स्थापना १९७२ मध्ये झाली.नगरपालिका अस्थित्वात आली. त्यानंतर १९८२ मध्ये महानगरपलिकेची स्थापना झाली. त्याकाळी शहरात संकलित होणारा कचरा मोशी येथील गायरान मोकळ्या जमिनीवर टाकला जात होता. त्यावर कोणतीही प्रक्रिया करण्याची व्यवस्था नव्हती.**

१९९० च्या दशकात झपाट्याने लोकसंख्या आणि नागरीकरण वाढू लागले. १९९१ मध्ये मोशी येथील कचरा टाकण्यात आलेली जागा राज्य शासनाकडून कचरा डेपो म्हणून नामनिर्देशित केली. कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया होत नसल्यामुळे अक्षरश: कचऱ्याचे डोंगर उभा राहिले. १९९७ मध्ये महानगरपालिकेची हद्दवाढ करण्यात आली. त्यावेळी मोशीसह अन्य गावांचा समावेश महापालिकेत झाला. मोशी आणि परिसरातील नागरिकांना कचऱ्याच्या दुर्गंधीमुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. विधानसभा व महानगरपालिका निवडणुकीत कचरा डेपो आणि त्यावरील उपाययोजना हा कळीचा मुद्दा ठरला.

दरम्यान, २०१७ मध्ये महानगरपालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीची सत्ता आली. त्याच्या आधारे आमदार महेश लांडगे यांनी 'वेस्ट टू एनर्जी' अर्थात कचऱ्यापासून वीज निर्मिती हा प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रतिदिन १ हजार टन कचऱ्यावर प्रक्रिया करुन तब्बल १४ मेगावॅट वीज निर्मिती केली जात आहे. विशेष म्हणजे, हा प्रकल्प महाराष्ट्रातील पहिला असून, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते या प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. या प्रकल्पाचा दुसरा टप्पाही प्रगतीपथावर आहे.

कचऱ्यापासून वीज निर्मिती आणि पर्यावरण संवर्धनाचा 'रोल मॉडेल' म्हणून वेस्ट टू एनर्जी आणि पिंपरी-चिंचवडचा लौकीक महाराष्ट्रभरात निर्माण झाला आहे, ही पिंपरी-चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे.



"१० वर्षे विकासाची.. निरंतर विश्वासाची.." या ध्येयाने ही निवडणूक विकासाच्या मुद्यांवर आम्ही लढवत आहोत. पिंपरी-चिंचवडकरांच्या हितासाठी अविरतपणे काम करणार आहे. मोशीसह समाविष्ट गावांच्या विकासासाठी आम्ही सातत्याने काम केले आहे. आंद्रा, भामा आसखेड पाणी प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून, दुसऱ्या टप्प्याचे कामही प्रगतीपथावर आहे. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम केल्यामुळेच 'चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित झाला आहे. आगामी काळात शाश्वत विकासासाठी आम्ही काम करणार आहोत.

– महेश लांडगे, आमदार,
भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

## मोशी परिसरात 10 वर्षांत काय झाले?

1. वेस्ट टू एनर्जी - कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प सुरू झाला.
2. 'बफर झोन'ची हद्द १०० मीटरने कमी झाला.
3. नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉरला ७ हजार ५०० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला.
4. मोशी कषी उत्पन्न उप बाजार समितीची प्रलंबित कामे पूर्ण केली आणि बाजार समितीचे काम सुरू झाले.
5. 'मार्केट कमिटी'ने स्थानिकांना बजावलेल्या नोटिसा रद्द केल्या.
6. देहू-आळंदी रस्त्याचे चौपदरीकरण
7. आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्रासाठी पाठपुरावा
8. सेक्टर चारमधील उद्यान विकसित
9. विनायकनगरमध्ये भव्य क्रीडांगण
10. आंद्रा, भामा आसखेड पाणी योजनेमुळे पाणी पुरवठा सक्षम झाला.
11. बो-हाडेवाडी टीपी स्कीम रहिवाशी क्षेत्र वगळून राबवण्याचा निर्णय झाला.
12. भूमिगत केबल-इन्फ्रा-२ चे काम.
13. महावितरण भोसरी विभागातील भोसरी शाखा कार्यालयाचे विभाजन करुन मोशी व चिखली शाखा कार्यालयाची निर्मिती.

## टीपी स्कीममधून रहिवाशी क्षेत्र वगळले!

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील वाढीव हद्दीतील मौजे बोऱ्हाडेवाडी येथे नगर रचना योजना (T.P. SCHEMES) मधून रहिवाशी क्षेत्र वगळण्याबाबतचा प्रस्तावाला महानगरपालिका सर्वसाधरण सभेत प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. रहिवाशी क्षेत्र वगळण्यात आल्यामुळे आता 'ग्रीन झोन'मध्ये टी.पी. स्कीम राबवण्यात येणार आहे. त्यामुळे भूमिपुत्रांना दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार महानगरपालिका प्रशासनाने नगर रचना योजना राबवण्यास सुरूवात केली होती. मात्र, बोऱ्हाडेवाडी येथील स्थानिक शेतकरी, भूमिपुत्र यांनी निवासी क्षेत्र या योजनेतून वगळवावे. या करिता योजनेला विरोध केला. भूमिपुत्रांनी आमदार महेश लांडगे यांच्याकडे या प्रकरणात पाठपुरावा करावा, अशी मागणी केली होती.

# दिवाळीतील हवा अन् ध्वनिप्रदूषणावर नजर!

## पिंपरी-चिंचवडमधील महत्त्वाच्या ठिकाणांवर लक्ष

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे हवा प्रदूषण आणि ध्वनिप्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ होते. या प्रदूषणावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ बारकाईने लक्ष ठेवणार आहे. दिवाळीत ३१ ऑक्टोबर आणि १ नोव्हेंबर या दोन दिवसांत पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील १२ ठिकाणी ध्वनिप्रदूषणाची नोंद करण्यात येणार आहे. याचवेळी सहा ठिकाणी हवा प्रदूषणाची नोंदी घेतल्या जाणार आहेत.**



मागील काही काळापासून हवा प्रदूषणासोबतच ध्वनि प्रदूषणाची वाढ होत आहे. दोन्ही शहरांचा विस्तार सुरू असून, अनेक ठिकाणी बांधकाम प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांमुळे मोठी धूळ निर्माण होऊन हवा प्रदूषणात वाढ होत आहे. त्यातच वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यानेही हवा प्रदूषणात भर पडत आहे. वाहनांची संख्या जास्त असल्याने त्यांच्या आवाजानेही ध्वनिप्रदूषण वाढत आहे. याचबरोबर सामाजिक, राजकीय आणि धार्मिक कार्यक्रमात मोठ्या आवाजात ध्वनिवर्धक लावण्यात येत असल्यानेही ध्वनिप्रदूषणात वाढ होत आहे.

शहरातील हवा आणि ध्वनिप्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढलेले असताना दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे त्यात आणखी भर पडते. फटाक्यांच्या धुरामुळे हवेची पातळी विषारी बनते. याचवेळी त्यांच्या मोठ्या आवाजामुळे लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास होता. सातत्याने मोठा आवाज कानावर पडल्याने बहिरेपणाचा धोका निर्माण होतो. या सर्व गोष्टींचा विचार करून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दिवाळीच्या काळात हवा आणि ध्वनिप्रदूषणाच्या नोंदी घेतल्या जातात. या नोंदींच्या आधारे शहरातील प्रदूषणाचा तुलनात्मक अभ्यास शक्य होतो.

> दिवाळीच्या काळात प्रदूषणात मोठी वाढ होते. या प्रदूषणाच्या नोंदी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेतल्या जाणार आहेत. या नोंदींच्या आधारे प्रदूषणाच्या पातळीत होणारी वाढ समजू शकेल. यानुसार त्यावर उपाययोजना करता येतील.
>
> – कार्तिकेय लंगोटे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

### हवा प्रदूषण: एक गंभीर प्रश्न

दिवाळी हा भारतातील एक प्रमुख सण असून हा प्रकाशाचा आणि आनंदाचा सण म्हणून साजरा केला जातो. मात्र, या सणाच्या उत्सवात फटाक्यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. या फटाक्यांमुळे हवेत मोठ्या प्रमाणात प्रदूषण पसरते. हा सण प्रदूषणमुक्त आणि निरोगी पद्धतीने साजरा करणे आपल्या हातात आहे. आपण सर्वांनी मिळून पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करूया.

# चंद्रकांतदादांचां विजयी ‘कोथरूड पॅटर्न’

## मिशन विधानसभा निवडणूक: सोसायट्यांशी संपर्क; नागरिकांशी संवाद

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोथरूड विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टी-महायुतीचे लोकप्रिय उमेदवार चंद्रकांत दादा पाटील यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतली आहे. कोथरूड परिसरातील सोसायट्यांमध्ये संपर्क साधून आणि तेथील मतदारांशी संवाद साधून चंद्रकांतदादा हे घरोघरी पोहोचण्यात यशस्वी होत आहेत. पहिल्या टप्प्यातील प्रचारात तर त्यांनी चांगलीच मुसंडी मारली आहे. कोथरूडमध्ये विरोधी पक्षांतर्फे कोण उमेदवार, हे निश्चित होण्यापूर्वीच चंद्रकांतदादांचे कार्यकर्ते प्रत्यक्ष संपर्काद्वारे किंवा पदयात्रेद्वारे अनेक ठिकाणी पोहोचलेसुद्धा ! चंद्रकांत दादांच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या रॅलीत जो जनसागर उसळला होता, तो पाहता कोथरूडमधून त्यांचा विजय हा प्रचंड मताधिक्याने होईल, हे जवळजवळ निश्चित झाले आहे.**



चंद्रकांत दादांच्या पदयात्रांचा किंवा प्रचाराचा सहज कानोसा घेतला तर सोसायट्यांच्या समस्या सोडवत असतानाच, त्या ठिकाणी राहणाऱ्या स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन गरजेच्या आवश्यक सुविधा कशाप्रकारे उपलब्ध करून देता येतील, यावर त्यांनी भर दिला आहे. या समस्या सुटाव्यात यासाठी नागरिकांच्या पाठीशी ठाम राहण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. कोथरूड मतदारसंघामध्ये प्रचाराचा पहिला टप्पा चंद्रकांत दादांनी धुमधडाक्यात सुरू केला असून कोथरूड परिसरातील अनेक सोसायट्यांमधून संपर्क साधत आणि तेथील नागरिकांशी संवाद साधत असतानाच या परिसरातील प्रतिष्ठित नागरिकांना भेटून चर्चा करण्यावर त्यांनी भर दिला आहे. प्रचाराच्या या पहिल्या टप्प्यात त्यांनी कोथरूड, बाणेर, बालेवाडी, पौड रस्ता या परिसरातील सोसायट्यांना त्यांनी भेट देण्यासाठी जोमात सुरुवात केली आहे.

### 24 तास उपलब्ध असणारा आमदार...

चंद्रकांत पाटील यांच्याबद्दल या मतदारसंघात अतिशय आपुलकी असून २४ तास उपलब्ध असणारा आमदार आम्हाला हवा आहे, असे मत कोथरूडकर व्यक्त करताना दिसतात. आधी प्रदेशाध्यक्ष असताना किंवा नंतर मंत्रीपदी विराजमान झाल्यानंतरही चंद्रकांत दादा केव्हाही उपलब्ध असल्याची भावना, त्याचप्रमाणे संकटकाळी धावून जाणारा आमचा नेता असल्याचे अनेक जण बोलून दाखवतात. सुशिक्षित, उच्चभ्रू त्याचप्रमाणे काही गोरगरीब जनतेचा बनलेला हा मतदारसंघ असून गेल्या निवडणुकीत विजय मिळवल्यानंतरही चंद्रकांतदादांनी मतदारसंघामध्ये सातत्याने संपर्क ठेवला असल्यामुळे त्यांचे स्वागत ‘आपल्या घरातील उमेदवार’ असल्यासारखे सर्वत्र होत आहे, हाच त्यांचा ‘कोथरूड पॅटर्न’ त्यांना विजयश्रीकडे घेऊन जाणार असल्याची भावना मतदार बोलून दाखवत आहेत.

कोथरूड विधानसभा मतदार संघातून चंद्रकांत दादांना उमेदवारी मिळणार हे पूर्वीचे निश्चित झाल्यामुळे त्यांना प्रचारासाठी भरपूर वेळ मिळाला आहे. याउलट विरोधकांतर्फे कोण, हा घोळ आणि चर्चेचे गुऱ्हाळ शेवटपर्यंत सुरूच होते. उमेदवार शोधणे, त्याला सक्रिय करणे ही विरोधकांची मोठी मोहीम ठळकपणे दिसून आली. हा मतदारसंघ भारतीय जनता पार्टीकडे राहणार आणि चंद्रकांतदादा हेच उमेदवार असणार, हे आधीच ठरल्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराचे सूत्र आधीच निश्चित झाले होते आणि त्यानुरूप प्रचाराला सुरुवातही झाली आहे. भारतीय जनता पार्टी आणि संघ परिवाराचे त्याचप्रमाणे हिंदुत्ववादी आणि मित्रपक्षांचे कार्यकर्ते, झटून कामाला लागले असून अतिशय सूक्ष्म नियोजन, प्रत्येक दिवसाचे कार्यक्रम यांची आखणी झाली आहे. त्याप्रमाणे गाठीभेटींवर भर देण्यात आला आहे.

# विरोधकांची अवस्था 'दिवा विझतानाची फडफड'!

## शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यात शिवसैनिकांची सडकून टीका

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदारसंघामध्ये विरोधकांची अवस्था अगदी केविलवाणी झाली आहे. त्यांच्याकडे बोलण्यासारखे काही विषय राहिलेले नाहीत. त्यामुळे ते बेसुर झाले आहेत. सत्ताधारी आमदारांवर आरोप करण्यासाठी कोणताही विषय ठोस नाही. म्हणून बॅनर लावून टीका करण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. "दिवा विझताना जशी फडफड होते" अगदी तशीच विरोधकांची अवस्था झाली असल्याची टीका शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यात शिवसैनिकांकडून करण्यात आली.**




पिंपरी-चिंचवड शिवसेनेच्या वतीने महायुती तर्फे भाजपचे भोसरी विधानसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार महेश लांडगे यांच्या प्रचारार्थ निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपजिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, उपनेते इरफान सय्यद, संभाजी शिरसाठ, मनीषा फुंदे, उपजिल्हाप्रमुख अरुण जोगदंड, संदीप क्षीरसागर, सागर पाचारणे, रोहित जगताप, दत्ता आवराळे, संदीप जाधव, जान्हवी पवार आदी उपस्थित होते.

या निर्धार मेळाव्यात बोलताना उपजिल्हाप्रमुख भगवान पोखरकर म्हणाले की, कामाच्या माध्यमातून आमदार महेश लांडगे यांनी मतदारसंघाला एका सूत्रात बांधले आहे. मतदारांना विकासाच्या बाबतीत आपले भलेबुरे चांगलेच कळते. विरोधकांच्या खोट्या गप्पांना मतदान भुलणार नाहीत.

उपनेते इरफान सय्यद म्हणाले विरोधकांना दहा वर्षानंतर आरोप करायचे शहाणपण सुचले आहे. विरोधाला विरोध हे एकच सूत्र विरोधकांचे आहे. पण, मतदार सुज्ञ आहेत. आपल्या हाकेला धावणारे नेतृत्व कोणते हे मतदारांना आता चांगलेच कळते. गेली वीस वर्ष अनेक सुविधांसाठी आपण प्रतीक्षेत होतो. त्या सुविधा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यामुळे गेल्या दहा वर्षात आपल्याला उपलब्ध झाल्या. यामध्ये न्यायालय संकुल, इंजीनियरिंग कॉलेज, संतपीठ, नामांकित शैक्षणिक संस्था अशी अनेक उदाहरणे देता येतील. अनेक शासकीय योजना आपले सरकार राबवत आहे. त्या शासकीय योजना मतदारसंघातील माता-भगिनी युवक यांच्यापर्यंत कशा पोहोचतील याचा देखील पाठपुरावा लांडगे यांच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे झाला आहे.

संदीप शिरसाठ म्हणाले की, विरोधकांचे आरोप म्हणजे दिवा विझताना होणारी फडफड आहे. विरोधकांना जेव्हा बोलण्यासारखे काही नसते त्यावेळी खोटे आरोप केले जातात. हे भोसरी मतदारसंघामध्ये पहिल्यांनंतर स्पष्ट जाणवते. 2004 मध्ये मी रोजगारासाठी या शहरात आलो होतो. त्यानंतर उत्तरोत्तर मी प्रगती केली. मला कुठेही या मतदारसंघात दडपशाही जाणवली नाही. माझ्यासारख्या बाहेरून आलेल्या माणसाला जर या विधानसभा मतदारसंघामध्ये सुरक्षित वाटत असेल तर जे येथील स्थानिक आहे त्यांनाच कुठून दडपशाही दिसून येते, मला हेच कळत नाही. 288 मतदारसंघ महाराष्ट्र राज्यात आहेत. त्यापैकी एकमेव भोसरी मतदारसंघ असेल जिथे विरोधकांना खोट्या आरोपांचे बॅनर लावून प्रचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे स्पष्ट जाणवते की विरोधकांची अवस्था अगदी केविलवाणी झालेली आहे.

### गडी रांगडा पण मनानं हळवा..!

शिवसेनेच्या निर्धार मेळाव्यामध्ये उपनेते इरफान सय्यद म्हणाले "गडी पैलवान, दिसायला रांगडा" असे आमदार महेश लांडगे यांचे व्यक्तिमत्व आहे. पण आमदार मनानं अगदी हळवे आहेत. स्वच्छ चारित्र्याचे आहेत. महिला सक्षमीकरण आणि त्यांची सुरक्षा असा अजेंडा घेऊन ते काम करत आहे. त्यामुळे शहरातील माता भगिनी आपला पाठीराखा म्हणून त्यांच्याकडे पाहतात.हिंदुत्वाचा झेंडा हाती घेऊन त्यांनी एका विचाराने आपली वाटचाल सुरू केली. म्हणून आम्ही शिवसैनिक त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत.. शिवसैनिक विचाराने पक्के असतात.एकदा आदेश आला की ते मागेपुढे पाहत नाहीत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य प्रगतीपथावर जात आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आपल्या विचारांचे सरकार आणण्यासाठी आम्ही महेश लांडगे यांच्या पाठीशी उभे राहून एकजुटीने काम करणार आहोत.

---

# शिवसैनिकांचा संताप : मविआचे काम करणार नाही!

## विधानसभा निवडून : शरद पवार यांना पक्ष संपवण्याचा डाव

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी विधानसभा मतदारसंघात शरद पवार यांच्या पक्षाला जागा सुटल्याने उद्धव ठाकरे यांचे शिवसैनिक नाराज झाले आहेत. शिवसैनिकांनी बैठक घेऊन महाविकास आघाडीच्या उमेदवाराचं काम न करण्याचा ठराव केला आहे.**



शरद पवार यांनी पुणे जिल्ह्यात शिवसेना संपवण्याचा डाव केला आहे. असा आरोप ठाकरे गटाचे शहराध्यक्ष सचिन भोसले यांच्यासह शिवसैनिकांनी केला आहे. पिंपरी-चिंचवड मधील आकुर्डी येथील सेना भवन येथे ही बैठक पार पडली. महाविकास आघाडीत बंडखोरी होण्याची चिन्हे आहेत. नुकतीच शरद पवार यांच्या पक्षाची दुसरी यादी जाहीर झाली. यादीत पिंपरी विधानसभा मतदारसंघासाठी सुलक्षणा शीलवंत- धर यांचं नाव जाहीर करण्यात आलं. पिंपरी विधानसभा मतदारसंघात शहराध्यक्ष सचिन भोसले यांच्यासह माजी आमदार गौतम चाबुकस्वार इच्छुक होते. याबाबत त्यांनी पक्षश्रेष्ठींची भेट देखील घेतली होती. अखेर महाविकास आघाडीतील जागावाटप झाल्यानंतर पिंपरी विधानसभा मतदारसंघ हा शरद पवार यांच्या पक्षाला गेला. नाराज झालेल्या शिवसैनिकांनी आज आकुर्डीत सेना भवन या ठिकाणी बैठक घेतली. महाविकास आघाडीच्या उमेदवारांचं आम्ही काम करणार नाहीत. असा ठराव या बैठकीत करण्यात आला. गर्भगळीत झालेल्या शिवसैनिकांना वाली नसल्याने दोन वर्षे ते कळ धरतील याची शाश्वती नाही. आकुर्डीचे शिवसेनाभवन ओस पडले. साहेबांच्या राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारात कोणी शिवसैनिक झोकून देऊन काम करेल असे काही राहिलेले नाही. म्हणूनच म्हटले, वाटाघाटीत शहरातील ठाकरेंच्या शिवसेनेचा खात्मा झालाय. जय महाराष्ट्र!!! म्हणायलाही कोणी शिल्लक नाही, अशी खंत व्यक्त केली जात आहे.

### मविआच्या पक्षश्रेष्ठींची डोकेदुखी...

महाविकास आघाडीचा उमेदवार दिला असला तरी आम्ही देखील या मतदार संघातून लढणार असल्याचं स्पष्ट शिवसैनिकांनी सांगितलं. तिन्ही मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाचे इच्छुक उमेदवार अपक्ष उमेदवारी घेऊन बंडखोरी करणार आहेत. इच्छुक निवडणूक लढण्यावर ठाम आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीतील हा पेच पक्षश्रेष्ठी सोडवणार का? हे पाहावं लागणार आहे.




**धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व भारतीय राज्यघटनेतील एक गाभ्याचे तत्त्व असल्याविषयीचा (तोंडी) सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिलेला निर्वाळा काही आजचा नाही. धार्मिक अधिकारांसंबंधीच्या आजवरच्या अनेक न्यायालयीन प्रकरणांमधे निवाडा देताना सर्वोच्च न्यायालयाने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व हे भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत आणि म्हणून अपरिवर्तनीय चौकटीचा भाग असल्याचे स्पष्ट केले आहे.**

# धर्मनिरपेक्षतेचा खडतर प्रवास



तरीही स्वतंत्र भारतातील धर्मनिरपेक्षतेचा आजवरचा संकल्पनात्मक आणि राजकीय व्यावहारिक प्रवास अतिशय खडतर होता असे चित्र दिसेल. भारतीय राज्यघटनेच्या वाटचालीचा विचार केला तर धर्मनिरपेक्षतेच्या या प्रवासात तीन पातळ्यांवर अडथळे; अडचणी निर्माण झाल्या असे म्हणता येईल. त्यातली पहिली धर्मनिरपेक्षता या संकल्पनेच्या स्पष्टतेविषयीची होती/आहे. दुसरी राज्यसंस्थेच्या धर्मनिरपेक्ष व्यवहाराविषयी आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय आणि राज्यसंस्थेने तिचे पालन कसे करावयाचे याचबरोबर धर्मनिरपेक्षतेला बगल देण्याची गरज राज्यसंस्थेला आपल्या आजवरच्या व्यवहारात का आणि कशी भासली यातूनही या अडचणी निर्माण झाल्या. तिसरीकडे, भारतातील 'नागरी समाजा'चा व्यवहारदेखील धर्मनिरपेक्षतेच्या स्वीकारातील एक ठळक अडचण ठरला. धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार भारतीय राज्यघटनेने केला खरा परंतु धर्मनिरपेक्षता म्हणजे नेमके काय याविषयीचे आपले संकल्पनात्मक आकलन मात्र नेहमीच तोटके आणि सरधोपट स्वरूपाचे राहिले. सर्वोच्च न्यायालयात आत्ता दाखल झालेल्या याचिकेतही हे सरधोपट आकलन काम करताना दिसेल. आणीबाणीच्या काळ्या कालखंडात राज्यघटनेच्या प्रास्ताविकामध्ये सेक्युलर या विशेषणाचा समावेश केला गेला असला तरी त्यापूर्वीची राज्यघटनाही धर्मनिरपेक्ष होती व आहे. राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षता केवळ प्रास्ताविकातील उल्लेखातून वा (अनुल्लेखातून) व्यक्त होत नाही. ही धर्मनिरपेक्षता केवळ प्रतीकात्मक स्वरूपातील नाही. राज्यघटनेतील मूलभूत अधिकारांच्या तरतुदींमध्ये; त्यांच्याविषयीच्या चर्चेमध्ये धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा संकल्पनात्मक विस्तार केला गेला आहे. धर्मनिरपेक्षतेची संकल्पना पाश्चात्त्य आहे आणि म्हणून ती भारतासाठी उपयुक्त; आवश्यक नाही असा युक्तिवाद गंभीर तात्त्विक आणि आक्रस्ताळ्या राजकीय चर्चांमधे देखील अनेकदा केला जातो. खुद्द घटनाकारांना मात्र धर्मनिरपेक्षतेच्या स्वीकारात अनेकपदरी आशय सापडला होता असे आढळेल. युरोपातील विशिष्ट ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भात धर्मनिरपेक्षतावाद पुढे मांडला गेला तो संघटित धर्मसंस्था आणि राजेशाही यांच्यातील कुरघोडीच्या संदर्भात. त्यामुळे धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्मसंस्था आणि राज्यसंस्था यांची परस्परांपासून फारकत अशी मांडणी केली जाते. ती अपुरी व चुकीची आहे. युरोपपलीकडे; भारतासह इतर अन्य आधुनिक राष्ट्रीय समाजांनी धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केला तो निरनिराळ्या कारणांनी. त्यातील एक कारण म्हणजे खुद्द आधुनिकता. आधुनिक समाजातील व्यक्तीची प्रतिष्ठा; अधिकार आणि ऐहिक, सार्वजनिक क्षेत्रांचा उदय यातून धर्माच्या सामाजिक नियंत्रणावर काही एक मर्यादा येतील; याव्यात अशी एक कल्पना धर्मनिरपेक्षतेत गृहीत आहे. ही भूमिका धर्माचा त्याग करणारी, तसे सुचवणारी नाही तर धर्माचे समाजव्यवहारांवर सर्वंकष स्वरूपाचे नियंत्रण असू शकत नाही हे सुचवणारी आहे. त्यामुळे सार्वजनिक व्यवहारांचे नियंत्रण 'केवळ' धर्मसंस्थेमार्फत केले जाऊ नये असे धर्मनिरपेक्षतेत गृहीत आहे. म्हणजेच धर्मनिरपेक्षता केवळ दोन किंवा अधिक धार्मिक समुदायांचे त्यांच्यातील संघर्षाचे नियंत्रण करण्याचे तत्त्व म्हणून न वावरता;समाजाची होणारी जडणघडण आणि लोकशाही नावाच्या मूल्याचा स्वीकार दर्शवणारे तत्त्व म्हणून वावरते. भारतासारख्या बहुधर्मीय आणि बहुल अस्मितांचा आविष्कार घडवणाऱ्या समाजात हे तत्त्व महत्त्वाचे ठरते, असे तर घटनाकारांना ठामपणे वाटले होतेच परंतु त्याखेरीज आधुनिक परंतु 'तथाकथित' एकधर्मीय राष्ट्रीय समाजामध्ये देखील धर्मनिरपेक्षता नावाची संकल्पना आणि तिचा राजकीय -सामाजिक व्यवहार महत्त्वाचा ठरतो.

## प्रासंगिक »


# मध्यमवर्ग मेला

***खेड्यातील गरिबापेक्षा शहरी गरिबासमोर चलनवाढीचे आव्हान अधिक मोठे असते. पण या गरिबीस हाताळायचे कसे याचे उत्तर धोरणकर्त्यांकडे नाही...***

अलीकडे 'लोकसत्ता'ने अर्थव्यवस्थेतील ताणतणावांबाबत वरचेवर लिहिले. ते वाचून वास्तवाकडे डोळेझाक करण्याची सवय लागलेल्या सुखासीन जल्पकांचा जळफळाट होणे साहजिक. अशा वेळी हे जल्पकजग शहामृगाप्रमाणे वाळूत माना खुपसून तरी बसते किंवा सत्यकथन करणाऱ्यावर हेत्वारोप तरी करते. तथापि विविध वित्तसंस्थांनी प्रत्यक्षपणे आणि साक्षात रिझर्व्ह बँकेनेच अप्रत्यक्षपणे 'लोकसत्ता'च्या भूमिकेस दुजोरा दिला असून सध्याच्या सणासुदीच्या हंगामातही महत्त्वाच्या चीजवस्तूंना उठाव कसा नाही, याचा तपशील प्रसृत केला आहे. जपानच्या 'नोमुरा'सारख्या बलाढ्य वित्तसंस्थेच्या मते चक्र जसे त्याचा अर्थ मागणी मंदावत असून अर्थव्यवस्थेच्या विविध अंगांस या मंदावलेल्या अर्थव्यवस्थेचा चिमटा बसताना दिसतो.

जॉर्जिया या कॉकेशन पर्वतराजींमधील सामरिक महत्त्वाच्या देशात नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालाची चर्चा भलतीकडे सरकू लागली आहे. या निवडणुकीचे विश्लेषण करण्याआधी जॉर्जियाचा अलीकडचा इतिहास जाणून घेणे आवश्यक ठरते. एरवी हा तसा शांतताप्रिय आणि स्वाभिमानी देश.

# जॉर्जियात निवडणुकीत 'रशिया'ची सरशी!



परंतु जन्मापासूनच रशियासारख्या आडदांड शेजाऱ्याशी अस्तित्वाची लढाई लढावी लागत असल्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये पश्चिमेकडे आणि युरोपवादाकडे झुकू लागला होता. १९९१मध्ये सोव्हिएत रशियाकडून फारकत घेतलेल्या ज्या देशांविषयी व्लादिमीर पुतिनप्रणीत रशियाच्या मनात आकस नेहमीच राहिला, त्यांमध्ये प्रमुख होते युक्रेन आणि जॉर्जिया. जॉर्जियाच्या नागरिकांनी अनेक शतके पर्शियन, ऑटोमन साम्राज्यांच्या तडाख्यातून आपली संस्कृती, भाषा जपण्याचा प्रयत्न केला. आता गेली तीन दशके मध्ययुगीन साम्राज्यांची जागा रशियाने घेतलेली आहे. नवीन सहस्राकाच्या सुरुवातीस रशियात व्लादिमीर पुतिन अध्यक्ष बनल्यानंतर आणि नंतर लगेचच तिकडे जॉर्जियात मिखाइल साकाश्विली हे अध्यक्ष बनल्यानंतर दोन देशांतील सुप्त शत्रुत्व उघड वैरभावात परिवर्तित होऊ लागले. साकाश्विली यांना जॉर्जियाला वैचारिक, आर्थिक, राजकीयदृष्ट्या नाटो आणि युरोपीय समुदायाकडे म्हणजेच रशियापासून दूर न्यायचे होते. पुतिन यांना ते मंजूर नव्हते. युक्रेनवर दोन वर्षांपूर्वी आणि दहा वर्षांपूर्वी झालेल्या रशियन आक्रमणांविषयी आज साहजिक बरेच लिहिले-बोलले जाते. पण २००८ मध्ये रशियाने साऊथ ओसेटिया आणि अबखाझिया या जॉर्जियाच्या दोन प्रांतांवर आक्रमण केले. जॉर्जियाने प्रतिकार केला, पण हे दोन्ही प्रांत आज रशिया आणि रशिया-समर्थित बंडखोरांच्या ताब्यात आहेत. ते स्वतंत्र देश असल्याचे रशियाच्या पार्लमेंटने म्हटले आहे. या दोन देशांच्या रक्षणासाठी तेथे रशियाचे सैन्य तैनात आहे. २१व्या शतकात युरोपीय भूमीवरील ते पहिले युद्ध ठरते. त्या कारवाईचे प्रारूप बरेचसे युक्रेनवरील आक्रमणासारखेच आहे. प्रथम अशा देशात रशियनबहुल प्रांतांमध्ये बंडखोरांना मदत करायची, अस्थैर्य निर्माण करायचे, नि अस्थैर्याचे रूपांतर थेट लष्करी कारवाईत करायचे. त्यास प्रादेशिक, सांस्कृतिक अस्मितेची जोड द्यायची. युक्रेनवर आक्रमण केल्यानंतर अनेक विश्लेषकांनी रशियाचा पुढील 'युक्रेन' म्हणजे जॉर्जिया असेल असे म्हटले होते, त्याची ही पार्श्वभूमी.जॉर्जियात नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष बिद्झिना इवानिश्विली यांच्या जॉर्जियन ड्रीम (जीडी) पक्षाला बहुमत मिळाल्याचे जाहीर करण्यात आले. या निवडणुकीत अनेक गैरप्रकार झाले,युनायटेड नॅशनल मूव्हमेंट (यूएएम) या विरोधी पक्षांच्या आघाडीने केला. या आघाडीला जनमत चाचण्या, तसेच मतदानोत्तर चाचण्यांमधून बहुमत मिळेल, असे दिसून आले होते. प्रत्यक्षात रविवारी मतमोजणी झाली, त्या वेळी जीडीला ५४ टक्के मते मिळाल्याचे आणि यूएएमला ३८ टक्के मते मिळाल्याचे तेथील निवडणूक यंत्रणेने जाहीर केले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बंडोबांना थंडोबा करण्याचे आव्हान!

## महायुती, महाआघाडी आणि तिसऱ्या आघाडीची परिस्थिती सारखीच

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**विधानसभा निवडणुकीचे उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपल्यावर महायुती आणि महाविकास आघाडीसह तिसऱ्या आघाडीतील बंडखोरांमुळे डोकेदुखी वाढली आहे. निवडणूक लढणारच असा निर्धार बंडखोरांनी केल्याने त्यांची समजूत तरी कशी काढायची याचा पेच त सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांना पडला आहे.**



गेली काही वर्षे राज्यांमध्ये एकीकडे काँग्रेस – राष्ट्रवादी आणि दुसरीकडे भाजप – शिवसेना असे दोन्हीकडे दोन दोन प्रमुख पक्ष होते. यावेळीच्या निवडणुकीत महायुतीमध्ये भाजप, एकनाथ शिंदे शिवसेना, अजित पवार राष्ट्रवादी तर महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस, उद्धव ठाकरे शिवसेना, शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस असे तीन प्रमुख पक्ष आहेत. या तिन्ही पक्षांनी निवडणुकीच्या आधी काही महिने मुलाखती घेतल्याने इच्छुकांच्या अपेक्षाही वाढल्या होत्या. आता उमेदवारी न मिळाल्याने अनेक मतदारसंघात बंडखोरीला उत आला आहे. प्रभावी बंडखोरांची बंडखोरांबाबत कोणती मात्रा लागू करायची याचा पेच नेत्यांसमोर निर्माण झाला आहे. कोल्हापूर उत्तर मतदारसंघात काँग्रेसने राजेश लाटकर यांची उमेदवारी जाहीर केली. त्यांना विरोध झाल्याने मधुरिमाराजे छत्रपती यांची उमेदवारी घोषित केली. संतप्त झालेल्या लाटकर यांनी उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने काँग्रेसची कोंडी झाली आहे. चंदगडमध्ये बंडखोरांचे पेव फुटले आहे. येथे अजित पवार राष्ट्रवादीचे राजेश पाटील हे आमदार पुन्हा रिंगणात असताना त्यांच्या विरोधात भाजपचे शिवाजीराव पाटील यांनी बंडखोरी केली आहे. जनस्वराज्य शक्ती पक्षाचे मानसिंग खोराटे यांची उमेदवारी ही येथे महायुतीची डोकेदुखी बनली आहे. शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसने नंदिनी बाभुळकर यांना उमेदवारी दिली असताना येथे काँग्रेसचे गोपाळराव पाटील, गतवेळचे उमेदवार विनायक पाटील यांनी अर्ज भरले असल्याने गोंधळ निर्माण झाला आहे

. करवीरमध्ये एकनाथ शिंदे शिवसेनेने चंद्रदीप नरके यांना उमेदवारी दिली असली तरी भाजपच्या सहयोगी पक्ष असलेल्या जनस्वराज्य शक्तीचे संताजी घोरपडे यांनी बंडखोरी केली आहे. यामुळे नरके समर्थकांनी पन्हाळ्यात विनय कोरे यांना धडा शिकवण्याची भाषा चालवली आहे. इचलकरंजीत दोन्ही ठिकाणी बंडाचे झेंडे लागले आहेत. भाजपचे राहुल आवाडे यांच्या विरोधात अजित पवार राष्ट्रवादीचे विठ्ठल चोपडे यांनी बंडाचा झेंडा रोवला आहे. शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे मदन कारंडे यांना भाजप हिंदुराव शेळके यांनी पाठिंबा दिला असताना येथे माजी आमदार पुत्र सुहास अशोक जांभळे यांनी बंडाचे निशाण रोवले आहे. राधानगरीत पुन्हा उद्धव ठाकरे शिवसेनेचे के. पी. पाटील यांच्या विरोधात त्यांचे मेहुणे ए. वाय. पाटील यांनी पुन्हा बंडखोरी केल्याने महाविकास आघाडी पेच निर्माण झाला आहे.

शिरोळमध्ये महायुतीतून राजेंद्र पाटील यांनी अपक्ष शाहू आघाडीच्या माध्यमातून अपक्ष अर्ज भरला असताना येथे भाजपचे विजय भोजे, मुकुंद गावडे यांचे अर्ज दाखल केल्याने डोकेदुखी वाढले आहे. काँग्रेसचे गणपतराव पाटील यांच्यासोबत राहिलेले उद्धव ठाकरे शिवसेनेचे माजी आमदार उल्हास पाटील यांनी ऐनवेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेत प्रवेश करून अर्ज भरला आहे. स्वाभिमानीच्या उमेदवारीमुळे हातकणंगलेतही कोंडी निर्माण झाली आहे. येथे जिल्हाध्यक्ष वैभव कांबळे यांना उमेदवारी दिली होती. मात्र उद्धव ठाकरे शिवसेनेतून स्वाभिमानीत प्रवेश केल्यानंतर डॉ. सुजित मिणचेकर यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केल्याने येथेही स्वाभिमानी समोर बंडाचे आव्हान निर्माण झाले आहे. सर्वशक्तिने रिंगणात उतरलेल्या भाजपने प्रत्येक जागा महत्वाची माणून बंडखोरी कशी टाळता येईल यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. नाराजांची समजूत घालण्याचे प्रयत्न केले जात आहे.

### बरडे यांनी अर्ज दाखल केला

काँग्रेसमध्ये मात्र श्रेष्ठींच्या आदेशाकडे लक्ष लागले आहे. पश्चिम नागपूर हा तसा भाजपचा बालेकिल्ला. २०१९ मध्ये तेथे काँग्रेसने झेंडा फडकावला. हा मतदारसंघ पुन्हा काबीज करण्याचे भाजपचे प्रयत्न आहेत. मात्र इच्छुकांची संख्या अधिक असल्याने होणारी बंडखोरी टाळण्यासाठी पक्षाने दक्षिण नागपूरचे सुधाकर कोहळे यांना उमेदवारी दिली. त्यांना बाहेरचा उमेदार म्हणून स्थानिक भाजप कार्यकर्त्यांनी, नेत्यांनी विरोध केला. भाजपचे नरेश बरडे यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला. पण मंगळवारी खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजांची भेट घेऊन त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

# तापमान २० अंश सेल्सिअसच्याही खाली

## राज्यात विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यभरात थंडीची चाहूल लागली आहे. किमान तापमान अनेक ठिकाणी २० अंश सेल्सिअसच्याही खाली गेले आहे. पहाटे हवेत गारवा जाणवत आहे. अपवादात्मक ठिकाणे वगळता कमाल तापमानही ३४ अंश सेल्सिअसच्या आत आहे. दक्षिण कोकण आणि दक्षिण- मध्य महाराष्ट्रात ढगाळ वातावरण तयार झाले आहे. तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.**



भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, उत्तरेकडून राज्यात थंड वारे येत आहेत. त्यामुळे कमाल आणि किमान तापमानात घट झाली आहे. मध्यरात्री आणि पहाटे हवेत गारवा जाणवत आहे. किमान तापमान राज्यात अनेक ठिकाणी २० अंश सेल्सिअसच्याही खाली गेले आहे. तर कमाल तापमान अपवादात्मक ठिकाणे वगळता ३४ अंश सेल्सिअसच्या खाली आहे. मागील दोन दिवसांपासून नाशिक, नगरसह उत्तर महाराष्ट्रात १८ अंश सेल्सिअसपर्यंत पारा आला आहे. मंगळवारी (२९ ऑक्टोबर) महाबळेश्वर येथे १५.४ अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. उत्तरेकडून येणारे थंड वारे आणि हवेतील बाष्प आणि पहाटे कमी होणाऱ्या तापमानामुळे राजाच्या बहुतेक भागात दाट धुके पडत आहे. अनेक ठिकाणी सकाळी आठ वाजेपर्यंत धुके पहावयास मिळत आहे. पुढील काही दिवस धुके कायम राहण्याचा अंदाज आहे

### तुरळक ठिकाणी ढगाळ वातावरण

. राज्यात उत्तर भारतातून काही प्रमाणात थंड वारे येत आहेत. तर, ईशान्य वारे राज्यावर येताना बंगालच्या उपसागरातून बाष्प सोबत आणत आहेत. या दोन्ही वाऱ्यांचा मिलाफ दक्षिण महाराष्ट्रावर होत आहे. त्यामुळे राज्याच्या काही भागात ढगाळ वातावरण तयार झाले आहे. पुढील तीन – चार दिवस दक्षिण कोकण आणि दक्षिण – मध्य महाराष्ट्रासह मराठवाडा आणि विदर्भातील तुरळक ठिकाणी ढगाळ वातावरण राहील. या भागात विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता आहे, अशी माहिती हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

# पैसे देऊन महिलांना लाचार बनवताय!

## लाडकी बहीण योजनेवरून राज ठाकरेंची महायुतीवर टीका!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र सरकारने यंदाच्या पावसाळी अधिवेशनात लाडकी बहीण योजना महिलांकरता अंमलात आणली. या योजनेला ४ कोटींहून अधिक महिलांनी लाभ घेतला असून यासाठी ४६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. दरम्यान, आतापर्यंत सरकारने या योजनेअंतर्गत पाच हप्ते पात्र महिलांच्या खात्यावर पाठवले आहे. आता आचारसंहिता लागल्याने महिला आणि बालविकास मंत्रालयात या योजनेसाठी निधी थांबवण्यात आला आहे. दरम्यान, यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टीका केली आहे. ते एबीपी माझाच्या माझा व्हिजन कार्यक्रमात बोलत होते.**



लाडकी बहीण योजनेवरून राज ठाकरे सातत्याने सरकारवर टीका करत आहेत. त्यांनी यापूर्वीही अनेकदा या योजनेविरोधात सरकारला धारेवर धरलं होतं. आता पुन्हा एकदा त्यांनी सरकारवर निशाणा साधला. लाडकी बहीण योजनेबद्दल बोलताना राज ठाकरे म्हणाले, “ज्याचा काही थांगपत्ता लागू शकत नाही अशी निवडणूक पहिल्यांदाच मी पाहतोय. त्यामुळे आता ते काय करणार आहेत हे माहीत नाही. माझं इतकंच म्हणणं आहे की कोणतीही गोष्ट फुकट देऊ नये. कारण कोणीही फुकट मागत नसतं. महाराष्ट्रातील भगिनींना सक्षम बनवा, त्यांच्यासाठी उद्योगधंदे आणा. त्यांच्याकडे त्यांच्या मेहनतीचे पैसे येऊ देत. त्या कुठे सांगतात मेहनतीशिवाय पैसे द्या. तुम्ही देताय म्हणून घेत आहेत. त्यांना लाचार बनवताय. फुकट गोष्टी देऊन त्यांना लाचा बनवतोय. आपण चुकीचं करतोय.” “उद्या तरुणांना पैसे द्यायला सुरुवात केलीत ते म्हणतील आता मला काम करण्याची गरजच नाही. पैसे मिळाल्यावर तरुण काहीही करेल. तो ड्रग्स घेईल.

माझं असं मत आहे की सरकारचं काम आहे की त्यांच्या हाताला काम देणं. शेतकरी कुठे मोफत वीज मागतोय. फक्त त्यात सातत्य ठेवा. थोडी कमी किंमतीत द्या”, असंही राज ठाकरे म्हणाले. “फुकट देण्याकरता एक-दोन महिना पैसा पुरेल. त्यासाठी कुठून तरी पैसे काढाल. पण नंतर महाराष्ट्र दिवाळखोरीला लागेल. महाराष्ट्र कंगाल होईल. या फुकटच्या योजनांमुळे एक लाख कोटीचं कर्ज होईल. आपण अजूनही कर्ज वाढवतोय. अशाने सरकार चालणार नाही”, असंही राज ठाकरे म्हणाले. “निवडणुकीच्या निकालानंतर कोणाचं सरकार बनेल असं राज ठाकरेंना विचारण्यात आलं. त्यावर ते म्हणाले, “सरकार युतीचं बनेल. तीन महिन्यांपूर्वी वाटत होतं की आघाडीचं पारडं जड आहे. पण हरियाणाच्या निकालांनंतर आता तसं वाटत नाही. अर्थात ही निवडणूक युतीला तितकी सोपीही नाही”, असंही राज ठाकरे म्हणाले. महाराष्ट्रातील भगिनींना सक्षम बनवा, त्यांच्यासाठी उद्योगधंदे आणा.

त्यांच्याकडे त्यांच्या मेहनतीचे पैसे येऊ देत. त्या कुठे सांगतात मेहनतीशिवाय पैसे द्या. तुम्ही देताय म्हणून घेत आहेत. त्यांना लाचार बनवताय. फुकट गोष्टी देऊन त्यांना लाचा बनवतोय. आपण चुकीचं करतोय.” “उद्या तरुणांना पैसे द्यायला सुरुवात केलीत ते म्हणतील आता मला काम करण्याची गरजच नाही. पैसे मिळाल्यावर तरुण काहीही करेल. तो ड्रग्स घेईल. माझं असं मत आहे की सरकारचं काम आहे की त्यांच्या हाताला काम देणं. शेतकरी कुठे मोफत वीज मागतोय. फक्त त्यात सातत्य ठेवा. थोडी कमी किंमतीत द्या”, असंही राज ठाकरे म्हणाले. “फुकट देण्याकरता एक-दोन महिना पैसा पुरेल. त्यासाठी कुठून तरी पैसे काढाल.

### महाराष्ट्र दिवाळखोरीला लागेल

महाराष्ट्र कंगाल होईल. या फुकटच्या योजनांमुळे एक लाख कोटीचं कर्ज होईल. आपण अजूनही कर्ज वाढवतोय. अशाने सरकार चालणार नाही”, असंही राज ठाकरे म्हणाले. “निवडणुकीच्या निकालानंतर कोणाचं सरकार बनेल असं राज ठाकरेंना विचारण्यात आलं. त्यावर ते म्हणाले, “सरकार युतीचं बनेल. तीन महिन्यांपूर्वी वाटत होतं की आघाडीचं पारडं जड आहे. पण हरियाणाच्या निकालांनंतर आता तसं वाटत नाही. अर्थात ही निवडणूक युतीला तितकी सोपीही नाही”, असंही राज ठाकरे म्हणाले. महाराष्ट्र सरकारने यंदाच्या पावसाळी अधिवेशनात लाडकी बहीण योजना महिलांकरता अंमलात आणली. या योजनेला ४ कोटींहून अधिक महिलांनी लाभ घेतला असून यासाठी ४६ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. आता आचारसंहिता लागल्याने महिला आणि बालविकास मंत्रालयात या योजनेसाठी निधी थांबवण्यात आला आहे. दरम्यान, यावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी टीका केली आहे.

# कॅनडातील हिंसेमागे अमित शाह : ट्रुडो सरकार

## भारत आणि कॅनडाचे संबंध दिवसेंदिवस खराब होत चालले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आता ट्रुडो सरकारने भारताचे गृहमंत्री अमित शाह यांच्यावर आरोप केले आहेत. अमित शाह यांचा कॅनडातील हिंसक घटनांमध्ये सहभाग असल्याचा आरोप कॅनडाने केला आहे. हे आरोप करत असताना त्यांनी कुठलाही पुरावा मात्र दिलेला नाही.**



भारत आणि कॅनडाचे संबंध दिवसेंदिवस खराब होत चालले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो सातत्याने भारतविरोधी शक्तींना देशात आश्रय देत असल्याचं पाहायला मिळत आहे. तर, कॅनडातील काही हिंसक घटनांप्रकरणी तिथल्या जस्टिन ट्रुडो सरकारने भारतावर गंभीर आरोप केले आहेत. परंतु, भारताने ते आरोप फेटाळले आहेत. त्यापाठोपाठ भारताने आपले कॅनडातील उच्चायुक्त आणि अन्य राजनैतिक अधिकाऱ्यांना परत बोलावून घेतलं आहे. त्यानंतर कॅनडाचे भारतातील अधिकारी देखील मायदेशी परतले आहेत. खलिस्तानी फुटीरतावादी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येत भारताच्या कथित सहभागाबाबतच्या आरोपानंतर भारत व कॅनडाचे संबंध बिघडले आहेत. दरम्यान, कॅनडाने कोणत्याही पुराव्यांशिवाय केलेल्या आरोपांवर भारताने कुठल्याही प्रकारची प्रतिक्रिया दिलेली नाही. यापूर्वी कॅनडाने भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा यांच्यावरही अशाच प्रकारचे आरोप केले होते. तेव्हा भारताने कॅनडाच्या आरोपांचं खंडन केलं होतं. रॉयटर्सने दिलेल्या वृत्तानुसार, मंगळवारी कॅनडा सरकारने आरोप केले.

### हिंसेमागे अमित शाह आहेत

अमित शाह यांचाही सहभाग आहे. शीख फुटीरतावाद्यांविरोधातील हिंसक घटनांमागे शाह यांचा हात असल्याचं कॅनडाने म्हटलं आहे. सर्वप्रथम वॉशिंग्टन पोस्टने एक वृत्त प्रसिद्ध केलं होतं की कॅनडा सरकारचे आरोप आहेत की शीख फुटीरतावाद्यांविरोधात कॅनडात झालेल्या हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये अमित शाह यांचाही सहभाग आहे. रॉयटर्सच्या वृत्तानुसार कॅनडाचे उप परराष्ट्रमंत्री डेव्हिड मॉरिसन यांनी संसदीय समितीला सांगितलं की शीख फुटीरतावाद्यांविरोधातील हिंसेमागे अमित शाह आहेत.

# सनीने केला मराठी गाण्यावर जबरदस्त डान्स



बॉलीवूड अभिनेत्री सनी लिओनी तिच्या बोल्ड अंदाजामुळे नेहमी चर्चेत असते. अभिनयाबरोबरच आपल्या वैयक्तिक आयुष्याबद्दलचे अपडेट्स ती सोशल मीडियावर शेअर करताना दिसते. उत्तम डान्सर असलेली सनी लिओनी नुकतीच मराठी गाण्यावर थिरकली होती. सनीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होताना दिसत आहे. हता दुर्गुळे अभिनीत 'कन्नी' या मराठी चित्रपटातील 'नवरोबा नवरोबा' गाण्यावर सनी हटके डान्स मूव्हज करताना पाहायला मिळतेय. क्रॉप टॉप आणि मिनी स्कर्ट असा को-ऑर्ड सेट तिने या गाण्यासाठी परिधान केला आहे. निळ्या रंगाच्या बूट्स आणि मॅचिंग हॅटची निवड करीत सनीने हा लूक पूर्ण केला आहे.

# राघवन या पात्रासाठी कोणाला घ्यायचं..!

प्रसिद्ध फिल्ममेकर आणि कोरिओग्राफर फराह खानने शाहरुख खानच्या 'मैं हूं ना' या चित्रपटाच्या माध्यमातून दिग्दर्शनात पदार्पण केले. शाहरुख खानची प्रमुख भूमिका असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली. या चित्रपटात झायेद खान, सुष्मिता सेन, अमृता राव आणि सुनील शेट्टी यांसारखे दिग्गज कलाकारही मुख्य भूमिकेत होते. फराहने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत या सगळ्यांना एका चित्रपटासाठी एकत्र आणण्यात आलेल्या आव्हानांबद्दल खुलासा केला आहे. या चित्रपटाच्या कास्टिंगसाठी फराह खानला बऱ्याच समस्या आल्या. याबद्दलच तिने मॅशेबल इंडियाच्या 'द बॉम्बे ड्रीम शोम'ध्ये कास्टिंग डायरेक्टर मुकेश छाब्रा यांच्याशी संवाद साधताना खुलासा केला. शाहरुखने एका झटक्यात तिच्या चित्रपटाला होकार दिला, पण इतरांचं कास्टिंग करताना मात्र फराहला खूपच त्रास झाला. झायेद खानच्या भूमिकेसाठी याआधी हृतिक रोशन, अभिषेक बच्चन व सोहेल खान यांना विचारण्यात आलं होतं अन् अमृता रावच्या भूमिकेसाठी प्रथम आयेशा टाकीया ही फराहची पहिली पसंती होती. हे तिने या मुलाखतीदरम्यान स्पष्ट केलं.या चित्रपटातील खलनायक म्हणजेच राघवन या पात्रासाठी कोणाला घ्यायचं हादेखील फराहसमोर एक मोठा प्रश्न होता. या भूमिकेसाठी शाहरुखच्या आग्रहाखातर फराहने कमल हासन यांनाही विचारलं होतं, शाहरुखच्या चित्रपटाला ते नकार देणार नाहीत.

# तुम नज़रें ठीक करो!

प्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी ही सोशल मीडियावर विविध पोस्ट शेअर करत असते. हेमांगीच्या 'बाई, बुब्स आणि ब्रा' या पोस्टनं अनेकांचे लक्ष वेधलं होते. हेमांगी विविध विषयांवर आधारित पोस्ट शेअर करत असते. आता हेमांगीनं जागतिक महिला दिनानिमित्त खास पोस्ट शेअर केली आहे. हेमांगीनं या पोस्टमध्ये स्वत:चा एक फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये हेमांगी ही खिडकीच्या बाहेर दिसताना दिसत आहे. हेमांगीनं तिच्या या फोटोला खास कॅप्शन देखील दिलं आहे. या कॅप्शनमध्ये तिनं परीतोष त्रिपाठी यांची कविता लिहिली आहे. या कवितेनं अनेकांचे लक्ष वेधलं आहे.पुढे हेमांगीनं पोस्टमध्ये लिहिलं, "परीतोष त्रिपाठी जियो! कल के दौरान आपने ये पंक्तियां पेश की और मेरी आंखें भर आयी. इसमें वो हर एक शब्द है, है, जो मैं पिछले कुछ दिनों से कहना चाहती थी, जोर जोर से चिल्लाना चाहती थी! कुछ लोगों के लिए औरतों की किसी भी क्षेत्र में पायी गयी कोई मायने ही नहीं रखती. ऐसे लोग सिर्फ और सिर्फ उसने कपडे क्या पहने हैं, कैसे पहने हैं इस बात पर वक्त निकाल निकाल के बाते करते हैं, करते हैं, अपना और दुसरों का वक्त जाया करते हैं!के जरीए संस्कृती और सभ्यता के नाम पर हमें फिरसे गुलाम, कमजोर बनाना चाहते हैं!



# राधिकाने चित्रपटातील संवाद केले कॉपी!

मुकेश अंबानी व नीता अंबानी यांचे छोटे सुपुत्र अनंत अंबानी यंदा लग्नबंधनात अडकणार आहेत. जुलै महिन्यात राधिका मर्चंटशी अनंत अंबानी लग्नगाठ बांधणार आहेत. त्याआधी नुकताच जामनगरमध्ये दोघांचा मोठ्या थाटामाटात प्री-वेडिंग सोहळा पार पडला. १ मार्च ते ३ मार्च असा तीन दिवसांच्या या सोहळ्याला देश-विदेशातून दिग्गज मंडळी उपस्थित राहिली होती. अनंत-राधिकाच्या प्री-वेडिंग सोहळ्याची चर्चा देशासह जगभरात अजूनही सुरू आहे. फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले आहेत. अशातच प्री-वेडिंग सोहळ्यात मुकेश अंबानींच्या धाकट्या सूनेने दिलेल्या भाषणात हॉलीवूड चित्रपटातील संवाद कॉपी केल्याचं समोर आलं आहे. यासंबंधित व्हिडीओ सोशल मीडियावर खूपच चर्चेत आला आहे.अनंत अंबानींची होणारी पत्नी राधिका मर्चंट हिने अंबानी कुटुंबासाठी एका भाषणातून भावना व्यक्त केल्या होत्या. मुकेश अंबानींपासून ते श्लोका मेहतापर्यंत अंबानी कुटुंबातील प्रत्येक सदस्याविषयी राधिका बोलली होती. यावेळी तिने होणारे पती अनंत यांच्यासाठी हृदयस्पर्शी भाष्य केलं. जे ऐकून नेटकऱ्यांना एका हॉलीवूड चित्रपटाची आठवण झाली.राधिकाचा हा व्हिडीओ 'सादिक सलीम' या इन्स्टाग्रामवर शेअर करण्यात आला आहे. ज्यामध्ये २००४ साली प्रदर्शित झालेल्या SHALL WE DANCE? या चित्रपटातील संवाद अंबानींच्या होणाऱ्या सूनेने आपल्या भाषणात कॉपी केले आहेत. या चित्रपटात अभिनेत्री सुसान सरंडन हे संवाद म्हणताना दिसत आहेत. तिचे हेच संवाद शब्दशः राधिका बोलताना पाहायला मिळत आहे. 'विटनेस टु योर लाइफ' असं या संवादाचे नाव आहे. राधिकाचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे.या व्हिडीओवर अनेक नेटकऱ्यांनी राधिकाला ट्रोल केलं आहे. तर काही नेटकऱ्यांनी तिचं समर्थन केलं आहे. एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'चॅटजीपीटीने सुद्धा चांगले संवाद लिहून देण्याचं काम केलं असतं.' तसंच दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'एवढा पैसा खर्च केला. तर एखाद्या संवाद लेखकाला कामासाठी घेऊ शकला असता.' तर तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं आहे, 'आता हिला आरामात चित्रपटाच्या ऑफर मिळतील.' अशा अनेक प्रतिक्रिया या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी दिल्या आहेत.दरम्यान, अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग सोहळ्याच्या पहिल्या दिवशी, १ मार्चला जगप्रसिद्ध पॉप स्टार रिहानाचा परफॉर्मन्स झाला. त्यानंतर दुसऱ्या

# अमिषा पटेल व्याजासहित पैसे द्यायला तयार

चेक बाऊन्स प्रकरणी गेल्या काही वर्षांपासून अभिनेत्री अमिषा पटेल (AMEESHA PATEL) ही चर्चेत आहे. आता न्यायदंडाधिकारी दिग्विजय नाथ शुक्ला यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. यावेळी अमिषा पटेलनें तक्रारदाराशी तडजोड करून त्याला व्याजासहित 2.75 कोटी रुपये देण्याचे मान्य केल्याचे सांगण्यात आले.कोर्टातील सुनावणीदरम्यान अमिषा पटेलच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, अमिषा पटेल तक्रारदाराला पाच हप्त्यांमध्ये 2.75 कोटी रुपये देण्यास तयार आहे. याप्रकरणी अंतिम स्तरावर चर्चा सुरू आहे. यावर तक्रारदाराचे वकील विजय लक्ष्मी श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमिषा पटेल यांना स्वतः हजर राहून तडजोड अर्जावर स्वाक्षरी करावी लागेल. न्यायालयाने अमिषा पटेलला आज (7 मार्च) जबाबा नोंदवण्यासाठी कोर्टात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तक्रारदाराचा जबाब नोंदवल्यानंतरआता अमिषा पटेल आणि कुणाल ग्रुमर यांचा जबाब नोंदवण्यात येणार आहे. यासाठी दोघांनाही न्यायालयात हजर रहावं लागणार आहे.रांचीच्या अरगोरा येथील रहिवासी असलेले चित्रपट निर्माता अजय कुमार सिंह यांनी देसी मॅजिक चित्रपट बनवण्यासाठी अमिषा पटेलला अडीच कोटी रुपये दिले होते, पण या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली नाही. यानंतर अजय कुमार सिंह यांनी अमिषा पटेलकडे पैसे परत मागितले. अमिषानं अजय कुमार सिंह यांना दोन चेक दिले, हे चेक बाऊंस झाले. या प्रकरणी अजय कुमार सिंह यांनी 2018 मध्ये अमिषा पटेल आणि कुणाल ग्रुमर यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर अमिषा पटेलने 17 जून रोजी रांची दिवाणी न्यायालयात आत्मसमर्पण केले होते. सध्या अमिषा ही जामिनावर आहे. अमिषा पटेलचा गदर-2 हा चित्रपट गेल्या वर्षी प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर रेकॉर्ड ब्रेक कमाई केली आहे. आता अमिषाच्या आगामी चित्रपटांची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत.चेक बाऊन्स प्रकरणी गेल्या काही वर्षांपासून अभिनेत्री अमिषा पटेल (AMEESHA PATEL) ही चर्चेत आहे. आता न्यायदंडाधिकारी दिग्विजय नाथ शुक्ला यांच्या न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी झाली आहे. यावेळी अमिषा पटेलनें तक्रारदाराशी तडजोड करून त्याला व्याजासहित 2.75 कोटी रुपये देण्याचे मान्य केल्याचे सांगण्यात आले.कोर्टातील सुनावणीदरम्यान अमिषा पटेलच्या वकिलाने न्यायालयाला सांगितले की, अमिषा पटेल तक्रारदाराला पाच हप्त्यांमध्ये 2.75 कोटी रुपये देण्यास तयार आहे. याप्रकरणी अंतिम स्तरावर चर्चा सुरू आहे. यावर तक्रारदाराचे वकील विजय लक्ष्मी श्रीवास्तव यांनी सांगितले की, अमिषा पटेल यांना स्वतः हजर राहून तडजोड अर्जावर स्वाक्षरी करावी लागेल.



# मुंबई इंडियन्सचं आधीचं ठरलंय?

## रोहित शर्माऐवजी मुंबईने पंड्याची कर्णधार म्हणून नियुक्ती

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**स्पर्धेतला बहुचर्चित असा हा संघ. मुंबई इंडियन्स संघाने गेल्या वर्षीच्या हंगामापूर्वी एका धक्कादायक निर्णय घेतला. पाच जेतेपदं मिळवून देणाऱ्या रोहित शर्माऐवजी मुंबईने हार्दिक पंड्याची कर्णधार म्हणून नियुक्ती केली. हार्दिकने मुंबई इंडियन्समधूनच आयपीएल कारकीर्दीला सुरुवात केली. अष्टपैलू हार्दिक पंड्याने मुंबईच्या जेतेपदांमध्ये मोलाची भूमिका बजावली आहे. मात्र गुजरात टायटन्स संघाने हार्दिकला ताफ्यात समाविष्ट केलं आणि समीकरणं बदलली.**



हार्दिकने स्वत:मधल्या नेतृत्वगुणांचा प्रत्यय घडवत पदार्पणाच्या हंगामातच गुजरातला जेतेपद मिळवून दिलं. सलग दुसऱ्या वर्षीही हार्दिकच्या नेतृत्वातील गुजरातने अंतिम फेरी गाठली पण जेतेपद त्यांना मिळू शकलं नाही. यानंतर ट्रेडऑफमध्ये मुंबई इंडियन्स संघाने हार्दिकला आपल्या ताफ्यात घेतलं. हार्दिकच्या समावेशाने संघाला संतुलन आणि बळकटी मिळेल असा विश्वास मुंबई संघव्यवस्थापनाला होता. हा विश्वास हार्दिकने सार्थ ठरवला. मुंबईने कर्णधार म्हणून रोहितच्या जागी हार्दिकची नियुक्ती केल्याने वादाला तोंड फुटलं. हार्दिकला सोशल मीडियावर आणि प्रत्यक्ष मैदानावरही प्रचंड ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. मुंबई इंडियन्सची कामगिरीही लौकिकाला साजेशी झाली नाही आणि त्यांना प्राथमिक फेरीतच गाशा गुंडाळावा लागला. यामुळे हार्दिकवरच्या टीकेचा जोर वाढला.हार्दिककडेच मुंबई संघाची सूत्रं असतील हे स्पष्ट असल्याने रिटेन्शन यादीत तो अव्वल स्थानी असेल. चाळिशीकडे झुकलेला आणि आंतरराष्ट्रीय टी२० प्रकारातून निवृत्ती घेतलेला रोहित शर्मा आणखी किती वर्ष खेळणार याबाबत स्पष्टता नाही. पण आणखी काही वर्ष रोहितने आपल्यासाठीच खेळावं असा मुंबईचा आग्रह असेल. मुंबई इंडियन्सकडून खेळतानाच सूर्यकुमार यादवने स्वत:च्या गुणवत्तेला न्याय देत दमदार भरारी घेतली. आंतरराष्ट्रीय टी२० प्रकारात सूर्यकुमारने अव्वल स्थानीही झेप घेतली. या प्रकारात सूर्यकुमार भारताचा कर्णधारही झाला. सूर्यकुमार मुंबई इंडियन्सचा कर्णधार होईल अशी चिन्हं होती. मात्र संघव्यवस्थापनाने हार्दिकच्या नावाला पसंती दिली. पण सूर्यकुमार मुंबईच्या फलंदाजीचा कणा असेल हे नक्की.भात्यात विविध अस्त्रं असलेला जसप्रीत बुमराह हा मुंबई संघाचा अविभाज्य कणा आहे. डावाच्या सुरुवातीला आणि हाणामारीच्या षटकांमध्ये विकेट्स पटकावणं आणि धावा रोखणं या दोन्ही आघाड्या बुमराहने समर्थपणे सांभाळल्या आहेत. भागीदारी फोडण्यात पटाईत अशी बुमराहची ख्याती आहे. बुमराहची चार षटकं वगळूनच प्रतिस्पर्धी संघाने नियोजन करावं असं माजी खेळाडू सांगतात. इतकी त्याची धास्ती आहे. रिटेन्शन यादीत बुमराहचं नाव पक्कं असणार याबाबत चाहत्यांच्या मनात तिळमात्रही शंका नाही. हार्दिकला सोशल मीडियावर आणि प्रत्यक्ष मैदानावरही प्रचंड ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं. मुंबई इंडियन्सची कामगिरीही लौकिकाला साजेशी झाली नाही आणि त्यांना प्राथमिक फेरीतच गाशा गुंडाळावा लागला. यामुळे हार्दिकवरच्या टीकेचा जोर वाढला.हार्दिककडेच मुंबई संघाची सूत्रं असतील हे स्पष्ट असल्याने रिटेन्शन यादीत तो अव्वल स्थानी असेल. चाळिशीकडे झुकलेला आणि आंतरराष्ट्रीय टी२० प्रकारातून निवृत्ती घेतलेला रोहित शर्मा आणखी किती वर्ष खेळणार याबाबत स्पष्टता नाही. पण आणखी काही वर्ष रोहितने आपल्यासाठीच खेळावं असा मुंबईचा आग्रह असेल. मुंबई इंडियन्सकडून खेळतानाच सूर्यकुमार यादवने स्वत:च्या गुणवत्तेला न्याय देत दमदार भरारी घेतली. आंतरराष्ट्रीय टी२० प्रकारात सूर्यकुमारने अव्वल स्थानीही झेप घेतली. या प्रकारात सूर्यकुमार भारताचा कर्णधारही झाला.सूर्यकुमार मुंबई इंडियन्सचा कर्णधार होईल अशी चिन्हं होती. मात्र संघव्यवस्थापनाने हार्दिकच्या नावाला पसंती दिली. पण सूर्यकुमार मुंबईच्या फलंदाजीचा कणा असेल हे नक्की.भात्यात विविध अस्त्रं असलेला जसप्रीत बुमराह हा मुंबई संघाचा अविभाज्य कणा आहे.

### हार्दिक पंड्याची मोलाची भूमिका

डावाच्या सुरुवातीला आणि हाणामारीच्या षटकांमध्ये विकेट्स पटकावणं आणि धावा रोखणं या दोन्ही आघाड्या बुमराहने समर्थपणे सांभाळल्या आहेत. स्पर्धेतला बहुचर्चित असा हा संघ. मुंबई इंडियन्स संघाने गेल्या वर्षीच्या हंगामापूर्वी एका धक्कादायक निर्णय घेतला. पाच जेतेपदं मिळवून देणाऱ्या रोहित शर्माऐवजी मुंबईने हार्दिक पंड्याची कर्णधार म्हणून नियुक्ती केली. हार्दिकने मुंबई इंडियन्समधूनच आयपीएल कारकीर्दीला सुरुवात केली. अष्टपैलू हार्दिक पंड्याने मुंबईच्या जेतेपदांमध्ये मोलाची भूमिका बजावली आहे.

# चेन्नईचा संघ कोणत्या खेळाडूंना रिटेन करणार?

## एमएस धोनी आणि रचिन रवींद्र यांना संघ कायम ठेवणार

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाच वेळचा आयपीएल चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्स संघामध्ये अनेक स्टार आणि दिग्गज खेळाडू आहेत. तर नवे युवा खेळाडू काही कमी नाहीत. त्यामुळे संघ कोणत्या खेळाडूंना रिटेन करणार याची उत्सुकता फारच आहे. पण चेन्नई सुपर किंग्स संघाने रिटेंशनच्या डेडलाईनपूर्वी एक दिवस आधी एक क्रिप्टिक पोस्ट शेअर केली. या पोस्टमध्ये सीएसकेने काही इमोजी टाकत एक कोडं टाकलं ज्यामध्ये जणू काही रिटेन केलेल्या खेळाडूंची नाव लपली होती.**



या कोड्यावरून संघ कोणत्या खेळाडूंना रिटेन करणार याचा चाहत्यांनी अंदाज लावला. चेन्नई सुपर किंग्सने पाच ते सहा खेळाडूंची नाव त्यात लपली आहेत अशी एक पोस्ट शेअर केली. ज्यात हेलिकॉप्टर, किवी, तलवारी, सिंह असे अनेक इमोजी आहेत. यावरून चेन्नईच्या रिटेन करण्यात येणाऱ्या खेळाडूंची नाव चाहत्यांनी मात्र सांगितली आहेत. यामध्ये ऋतुराज गायकवाड, रवींद्र जडेजा, मथिशा पाथिराना, एमएस धोनी आणि रचिन रवींद्र यांना संघ कायम ठेवणार असल्याचा अंदाज बहुतेक चाहत्यांनी व्यक्त केला आहे.चेन्नई सुपर किंग्सचा संघ अनकॅप्ड खेळाडू म्हणून एम एस धोनीला तर कॅप्ड खेळाडूंमध्ये ऋतुराज गायकवाड, शिवम दुबे, रवींद्र जडेजा, मथिशा पथिराना यांना रिटेन करू शकतात. याचबरोबर संघात अनेक किवी खेळाडू आहेत. किवी खेळाडूंचा आयपीएल संघ म्हटलं तर काही वावगं ठरणार नाही. रचिन रवींद्र, मिचेल सँटनर, डॅरिल मिचेल आणि डेव्हॉन कॉन्वे हे किवी खेळाडू आहेत. त्यापैकी संघ कोणत्या खेळाडूला राईट टू मॅच कार्ड वापरणार यावर सर्वांच्या नजरा आहेत.

### किवी खेळाडूंचा आयपीएल संघ

खेळाडूंना रिटेन करणार याचा चाहत्यांनी अंदाज लावला. चेन्नई सुपर किंग्सने पाच ते सहा खेळाडूंची नाव त्यात लपली आहेत अशी एक पोस्ट शेअर केली. ज्यात हेलिकॉप्टर, किवी, तलवारी, सिंह असे अनेक इमोजी आहेत. यावरून चेन्नईच्या रिटेन करण्यात येणाऱ्या खेळाडूंची नाव चाहत्यांनी मात्र सांगितली आहेत. यामध्ये ऋतुराज गायकवाड, रवींद्र जडेजा, मथिशा पाथिराना, एमएस धोनी आणि रचिन रवींद्र यांना संघ कायम ठेवणार असल्याचा अंदाज बहुतेक चाहत्यांनी व्यक्त केला